पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
Office of The Superintendent Of Police, Nagpur District (Rural), Nagpur
Tel No: - 0712-2566650, E-mail:- sp.nagpur.r@mahapolice.gov.in

क्रमांकः नाजिग्रा/डि–9/चा.पो.शि.भरती–2021/अंतिम निवडयादी व प्रतिक्षायादी/2023– 4608 नागपूर दि. 20/05/2023

# पोलीस अधीक्षक,नागपूर ग्रामीण
## पोलीस शिपाई चालक भरती–2021
### –:: उमेदवारांना सुचना ::–

- पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर चे आस्थापनेवर रिक्त असलेले 47 पदाकरीता चालक पोलीस शिपाई पदाचे पात्र उमेदवारांचे तात्पुरती निवडसुची व प्रतिक्षासुची मध्ये नांवे समाविष्ठ असल्याने त्या उमेदवारांना दिनांक 17/04/2023 रोजी मुळ कागदपत्रे /प्रमाणपत्रे पडताळणीकरीता नागपूर ग्रामीण कार्यालयात बोलाविण्यात आले होते. उमेदवारांचे आक्षेप/हरकती विचारात घेवून भरती मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार अंतिम निवडयादी व प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

- प्रवर्गनिहाय/खुला/सामाजिक/समांतर आरक्षण अंतर्गत अंतिम निवडयादी व प्रतिक्षायादी मधील उमेदवारांची निवड ही त्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची/कागपत्रांची संबंधित विभागाकडून पडताळणी, चारीत्र्य पडताळणी व वैद्यकीय तपासणीतील पात्रतेच्या अधिन राहुन करण्यात आलेली आहे. सदर पडताळणीमध्ये संबंधित विभागाकडून काही आक्षेप घेण्यात आल्यास/वैद्यकीय तपासणीत/ चारीत्र्य पडताळणीत अपात्र ठरल्यास किंवा उमेदवाराने पोलीस भरती प्रकियेमध्ये गैरप्रकार केला होता असे भविष्यात निष्पन्न झाल्यास निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्याचा अधिकार पोलीस भरती निवड मंडळास आहे. यासंबंधात उमेदवारांचा कोणताही दावा/तकार/हक्क राहणार नाही, याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

- हजर होते वेळी उमेदवारांनी मुळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

- कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यांचे नाव अंतिम निवड यादीतून वगळण्यात येईल.

- मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन निवडयादी व प्रतिक्षायादी प्रसिध्द करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने वरील प्रकरणातील अंतिम न्यायालयीन निर्णयाचे आधारे उमेदवारांची निवड/नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार पोलीस भरती निवड मंडळास आहे. यासंबंधात उमेदवारांचा कोणताही दावा/तकार/हक्क राहणार नाही,याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

- *अंतिम निवड यादीतील निवड झालेले खुला/सामाजिक/समांतर आरक्षणातील उमेदवार हजर न झाल्यास त्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची निवड करण्यांत येईल.*

- पोलीस शिपाई चालक भरती/2021 च्या भरती प्रकियेच्या अनुषंगाने अंतिम निवडयादी व प्रतिक्षायादी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या **www.mahapolice.gov.in** वर व पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण च्या **www.nagpurgraminpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

विशाल आनंद (भा.पो.से.)
पोलीस अधीक्षक,
नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर

Scanned by CamScanner